नायब तहसिलदार संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र.: लवेसू-२०२६/प्र.क्र.४०/आस्था-९**
**(E-1590684)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १२ मार्च, २०२६

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

**शासन आदेश:-**

विधानपरिषद नियम-१०१ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचना क्र.६१८ वर सभागृहामध्ये उत्तर देताना मा.मंत्री (महसूल) यांनी, भूसंपादन प्रकरणामधील जमिनीची मालकी आदिवासी कडून बिगर आदिवासीकडे बक्षिसपत्रान्वये हस्तांतरीत होणे, भूसंपादन निवाड्याशी संबंधित लवाद प्रकरण मा.लवाद तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रलंबित असणे याबाबी संदर्भातील विविध स्तरावरील अर्ध न्यायीक (Quasi Judicial) आदेश इत्यादी बाबींची गांर्भीयाने दखल घेऊन याबाबत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याची सभागृहामध्ये घोषणा केली तसेच सदर प्रकरणाशी संबंधित उप विभागीय अधिकारी कार्यालय, नंदूरबार कार्यालयातील सहायक जिल्हाधिकारी, सहायक महसूल अधिकारी व नायब तहसिलदार यांच्या नंदूरबार उपविभागाबाहेर बदल्या करण्याबाबत घोषणा केली आहे. त्यानुषंगाने प्रकरणाशी संबंधित **नायब तहसिलदार संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार, प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | नायब तहसिलदाराचे नाव व पदनाम | बदलीने करण्यात आलेली पदस्थापना |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्रीमती आशा सोनावणे, नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नंदुरबार, जि. नंदुरबार | नायब तहसिलदार तथा सहायक करमणूक कर अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जि.धुळे या रिक्त पदावर |

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत deske9-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे/टपालाद्वारे संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाने शासनास त्वरित कळवावे.

४. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

७. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१२१७०४५२६९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5B514D2C3257BBA976C5A2DE42BE8A635BBA691C05D1F65ED0EAD155A190E90E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2026.03.12 17:06:13 +05'30'

**(श्रीकांत म.मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, नाशिक.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

६. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
७. जिल्हाधिकारी, नंदुरबार/धुळे.
८. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार/धुळे.
१०. संबंधीत अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त यांच्यामार्फत).
११. निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.